पुढारी पान क्र.5

दि.23/04/2023

# मिरा-भाईंदरमध्ये काळी फित लावून केले नमाज पठण

## ईदगाहसाठी मैदानाची परवानगी नाकारल्याचा केला निषेध

भाईंदर : पुढारी वृत्तसेवा

मिरा-भाईंदरमध्ये मुस्लिमांसाठी रमजानच्या शेवटच्या दिवशीच्या नमाज पठणसाठी येथील मस्जिदींमध्ये पुरेशी जागा नसल्याने भाईंदर पश्चिमेकडील मैदान ईदगाहसाठी देण्याची मागणी भाईंदरच्या कब्रिस्तान संघर्ष समितीने पोलीस आयुक्तालयासह पालिकेकडे लेखी पत्राद्वारे केली होती. मात्र कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याच्या मुद्द्यावरून समितीला परवानगी नाकारल्याने मुस्लिमांनी शनिवारी काळी फित लावून नमाज पठण केले.




मुस्लीम समाजाकडून निषेधाचे बॅनर मस्जिदीच्या दर्शनीभागात लावण्यात आले होते. मात्र कुठेही अनुचित प्रकार न घडता नमाज पठणाचा कार्यक्रम शांततेत पार पडला.

मुस्लिमांना रमजानच्या शेवटच्या दिवशीची नमाज पठण करण्यासाठी भाईदर पश्चिम येथील कब्रस्तान मस्जिद व मीरारोड येथील जामा मस्जिद मुस्लिम जमात या दोनच मस्जिद उपलब्ध आहेत. मात्र यावेळी मोठ्याप्रमाणात मुस्लिम समाजातील लोकं एकाचवेळी नमाज पठणसाठी येत असल्याने पुरेशा जागेअभावी त्यांना एकाचवेळी नमाज पठण करणे अशक्य ठरते. त्याला पर्याय म्हणून रमजान ईदच्या ईदगाहसाठी भाईंदर पश्चिमेकडील नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान उपलब्ध करून देण्याची मागणी कब्रिस्तान संघर्ष समितीने ५ एप्रिल रोजी पोलीस आयुक्तालयासह पालिकेकडे केली. मात्र त्याला परवानगी नाकारण्यात आली. कारण या दिवशी अक्षय तृतीयेचा मुहूर्त साधून पालिकेच्या विविध विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पणासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस शहरात येणार असल्याने तसेच ते या मैदानामार्गे केशवश्रुष्टीला जाणार असल्याने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता वर्तविण्यात आली. यामुळेच बोस मैदान ईदगाहसाठी उपलब्ध करून देणे तांत्रिक अडचणीचे ठरल्याने त्याला परवानगी नाकारण्यात आल्याचे दोन्ही प्रशासनाच्या सूत्रांकडून सांगण्यात आले. मुस्लिमांना बोस मैदानात एकाचवेळी नमाज पठण करण्याकरीता परवानगी देण्याची मागणी समितीने पोलीस व पालिकेकडे केली होती. यामुळे नाराजी पसरल्याने काळी फित लावून रमजान ईदची नमाज पठण केल्याचे मुस्लिम जमातचे अध्यक्ष फारूक कुरेशी यांनी सांगितले.

सकाळ पू. पान क्र.२

# वसई एपीएमसीसाठी १९ उमेदवार रिंगणात

विरार, ता. २२ (बातमीदार) : वसई कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक ३० एप्रिल रोजी होणार आहे. यामध्ये ११ जागांसाठी १९ उमेदवार निवडणुकीला उभे आहेत. उमेदवारी मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी आठ उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतले आहेत. या निवडणुकीपूर्वी सहा जागा बिनविरोध झाल्या आहेत. त्यात पाच जागा बहुजन; तर एक जागा विरोधी पॅनेलला मिळाली आहे.

वसई कृषी उत्पन्न बाजार समिती निवडणुकीला रंगत येऊ लागली आहे. १९ जागांसाठी होणाऱ्या निवडणुकीत निवडणुकीपूर्वी सहा जागा बिनविरोध आल्या आहेत. यात ५ जागा बहुजन विकास आघाडीला मिळाल्या आहेत; तर एक जागा विरोधी पॅनेलला मिळाली आहे. बिनविरोध आलेल्या जागांमध्ये व्यापारी मतदारसंघातून बहुजन विकास आघाडीचे विमलकुमार अंबानी आणि सुनील सरवैया, भटक्या विमुक्तमधून आनंद वडे, दुर्बल घटकांमधून संजय घरत आणि महिलांमध्ये भारती पाटील या बहुजन विकास आघाडीच्या उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत; तर श्वेता पाटील या विरोधी पॅनेलमधून बिनविरोध आल्या आहेत. सर्वसाधारण सेवा सोसायटीच्या सात जागांसाठी ११ उमेदवार, ग्रामपंचायतीच्या सर्वसाधारण गटाच्या दोन जागांसाठी चार उमेदवार, सेवा सहकारी संस्थांच्या एका जागेसाठी दोन उमेदवार आणि ग्रामपंचायत अनुसूचित जमातीच्या एका जागेसाठी दोन उमेदवार उभे राहिले आहेत.

Scanned with CamScanner

पुढारी पान क्र. 3

दि. 23/04/2023

# भाईंदरची मेट्रो उत्तनपर्यंत नेणार

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आश्वासन





**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

दहिसर ते मिरा-भाईंदरची मेट्रोचे बांधकाम येत्या एक, दिड वर्षात पूर्ण होणार असून पुढे मेट्रो सुरु करण्याच्या कामाला गती दिली जाणार आहे. या मेट्रो अंतर्गत शहर कव्हर करण्यासाठी ही मेट्रो उत्तनपर्यंत नेणार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी दहिसर चेकनाका परिसरात असलेल्या स्व. लता मंगेशकर नाट्यगृहात पालिकेने आयोजित केलेल्या जाहीर कार्यक्रमात दिली.

पालिकेच्या विविध विकास कामांचे भूमिपूजन व लोकार्पणासाठी शनिवारी ते येथे आले होते. या कार्यक्रमानंतर मंगेशकर नाट्यगृहात आयोजित जाहीर कार्यक्रमात बोलताना त्यांनी वरील माहिती दिली. याबाबत मेट्रोच्या आढावा बैठकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत चर्चा झाली असून त्यात मेट्रो विस्ताराचा निर्णय झाल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मागच्या काळात साधारण ३३७ किमी चे मेट्रो नेटवर्क तयार करण्यात आले असून एका तासात एका भागातून दुसऱ्या भागात वेगाने पोहोचता आले पाहिजे, असे नियोजन करण्यात येत आहे. त्यांच्या हस्ते भाईंदर पश्चिमेकडील सुविधा भूखंडावर साकारण्यात येणाऱ्या महावीर भवनसह मीरा रोड पूर्व येथील आरक्षण क्रमांक २१० व २११ वर साकारण्यात येणाऱ्या रुग्णालयाचे भुमिपूजन, भाईंदर पश्चिमेकडील उड्डाणपुलाखाली बांधण्यात आलेल्या पशुपक्षी उपचार केंद्रासह तेथीलच सीसीटीव्ही नियंत्रण कक्ष, मिरागाव मधील पालिकेच्या भारतरत्न उस्ताद स्व. बिस्मिल्ला खान उर्दू शाळेची इमारत व काशिमीरा उड्डाणपुलाखालील संत रविदास महाराज उद्यानाचे लोकार्पण करण्यात आले.

दरम्यान, उर्दू शाळेचे लोकार्पण रमजान ईदच्या दिवशी झाल्याने हा ईदच्या दिवशी दिलेला चांगला उपहार ठरला आहे. सीसीटीव्ही नियंत्रण कक्षाबाबत त्यांनी ते इंटिग्रेटेड कमांडिंग व कॉंट्रोलिंग सेंटर नाही त्याला आवश्यक अशा फिड मिळत नसल्याने येत्या काळात त्यासाठी आवश्यक असलेला संपूर्ण निधी उपलब्ध करून दिला जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले. हे एक चांगले सर्व्हिलन्स सेंटर तयार होणार असून यामुळे रस्त्यावर गुन्हे कमी होण्यास मदत होणार आहे. आणि गुन्हा घडल्यास तो जवळपास १०० टक्के उघडकीस येणार आहे. याचप्रमाणे वाहतूककोंडीची समस्या सीसीटीव्ही नेटवर्कमुळे संपुष्टात आल्याचे पहायला मिळत असून पोलिसांनी अलिकडच्या काळात थांबायची व्यवस्थाच ठेवलेली नाही. वाहतुकीचे नियम मोडल्यास त्याचे चलान थेट मोबाईलवर येते. त्यामुळे पोलीस असो कि नसो वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यास दंड भरावा लागणार आहे. परिणामी वाहतुकीला शिस्त लागेल. यासाठी देखील निधी उपलब्ध करून दिला जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

# चोरी, घरफोडी करणाऱ्या आरोपीस अटक

## १ लाख ९७ हजारांचा मुद्देमाल जप्त

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

नायगाव पोलीस ठाणे हद्दीत चोरी, घरफोडी करणाऱ्या दोघांना अटक करून त्यांनी केलेले चार गुन्हे उघडीस आणून त्यांच्याकडून १ लाख ९७ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल नायगाव पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाने जप्त केला आहे.

नायगाव पोलीस ठाणे हद्दीत राहणाऱ्या सुभाष वसंत बनसोडे यांनी पोमण, कामण वसई पूर्व या ठिकाणावरुन कंपनीच्या बांधकामासाठी लागणारे वेगवेगळ्या कंपनीचे नळ, वायर असे ४ लाख २४ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल अज्ञात चोरट्याने चोरी केल्याबाबत अज्ञात आरोपी विरुद्ध नायगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता. या गुन्ह्याच्या तपासाच्या अनुषंगाने वरिष्ठांनी दिलेल्या सुचनानुसार नायगाव पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तपास करून आरोपी दिपक प्रेमनारायण तिवारी (२४) व गंगा देवीराम पनाल (२०) यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे तपास केला असता आरोपी यांनी बालकांच्या मदतीने गुन्हा केल्याचे उघडकीस आले. त्यावरून दोन आरोपींना अटक करण्यात आली. अटक आरोपी व बालक यांच्याकडे अधिक तपास केला असता त्यांनी नायगाव पोलीस ठाण्याच्या अभिलेखावरील ४ गुन्हे केल्याचे तपासात निष्पन्न झाले. त्या आरोपीकडुन गुन्ह्यातील चोरीस गेलेले मोबाईल व इतर मुददेमाल तसेच रोख रक्कम असा एकूण १ लाख ९७ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

Scanned with CamScanner

पुढारी पान क्र.7

दि.23/04/2023

# काम देण्याचे आमिष दाखवून आठ लाखांची फसवणूक

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

मिरारोड येथे राहणाऱ्या महिलेला घरबसल्या काम देण्याचे व चांगला नफा देण्याचे आमिष दाखवून ऑनलाईन ८ लाखांची फसवणूक केली आहे. ठाणे येथे खासगी कंपनीमध्ये काम करणाऱ्या व मिरारोड येथे महिलेला अनोळखी इसमाने फोन करून सांगितले की आमच्याकडे वर्क फ्रॉम होम काम असून तुम्हांला आम्ही सांगितलेल्या हॉटेलला रेटिंग दिली असता पैसे मिळणार आहेत. तरी तुम्ही इच्छुक असल्यास कळवा. त्यानंतर त्या महिलेने इच्छुक असल्याचे त्यांना सांगितले. त्यावेळी त्यांनी त्या महिलेला एका टेलीग्राम खात्यास जॉईन होण्यास सांगितले. टेलीग्राम खात्यास जॉईन केल्यानंतर त्यांना एका टेलीग्राम टास्क ग्रुपमध्ये जॉईन होण्यास सांगितले.

ती महिला ग्रुपमध्ये जॉईन झाली असता काही हॉटेलच्या नावाची यादी देवुन रेटिंग करण्यासाठी सांगितले. त्या महिलेने तीन हॉटेलला रेटिंग केली. त्या रेटिंग साठी त्या महिलेला १५० रु जमा झाले आहेत. त्यानंतर त्या टेलीग्राम धारकाने मर्चंट टास्क करावे लागेल असे सांगुन काही रक्कम गुंतवण्यास सांगितले. तसेच रक्कम गुंतवणुक केल्यास दुप्पट रक्कम मिळेल असे सांगितले. त्यानंतर एक युपीआय आयडी दिला व त्याद्वारे २००० रु भरण्यास सांगितले. २००० रु भरल्यानंतर परतावा मिळण्यासाठी टेलीग्राम धारकाने त्या महिलेला टास्क मध्ये अधिक रक्कम वेळोवेळी भरण्यास सांगितले. त्या महिलेने चांगला नफा मिळण्याच्या आमिषाने ८ लाख रुपये भरले. त्यानंतर त्या महिलेला मुद्दल व नफा दिला नाही. त्या मोबाईल धारकाने हॉटेलला रेटिंग देऊन घरबसल्या पैसे कमविण्याचे अमिश दाखवून बाबत ८ लाख रुपयांची फसवणुक केली आहे. त्यामुळे टेलीग्राम धारक रिया आरुष, विरेंद्र, लक्ष्मी यांच्या विरोधात नयानगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

लोकमत पू.पान क्र.3

# मीरा रोडच्या ऑर्केस्ट्रा बारवर पोलिसांचा छापा

**लोकमत न्यूज नेटवर्क**

**मीरा रोड :** मीरा रोडच्या रिलायन्स पेट्रोल पंपजवळील सोना ऑर्केस्ट्रा बारमध्ये बेकायदा नृत्यप्रकरणी भाईंदरच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक शाखेच्या पथकाने छापा टाकून नऊ जणांवर गुन्हा दाखल केला.

शिवार उद्यानाजवळील सोना ऑर्केस्ट्रा बारमध्ये गायिका म्हणून कार्यरत असलेल्या बारबाला तंग-तोकड्या कपड्यांत बेकायदा नाचत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिस निरीक्षक समीर अहिरराव यांच्यासह उमेश पाटील, विजय निलंगे, रामचंद पाटील, सम्राट गावडे, अश्विनी भिलारे, शुभांगी मोकल यांच्या पथकाने २० एप्रिलच्या मध्यरात्री बारवर छापा टाकला. याप्रकरणी पोलिस अधिक तपास करत आहेत.

लोकमत पू.पान क्र.4

# मुलीच्या हातातील मोबाइल चोरला

**लोकमत न्यूज नेटवर्क**

**मीरा रोड :** भाईंदर पूर्वेला न्यू गोल्डन नेस्ट येथील मुख्य रस्त्यावरून जाणाऱ्या १५ वर्षीय मुलीच्या हातातील ५२ हजारांचा मोबाइल रिक्षातून आलेल्या दोघा लुटारूंनी हिसकावून नेल्याप्रकरणी नवघर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

रामदेव पार्क भागात राहणारी स्निग्धा सिन्हा ही १० वीत शिकते. ती खासगी शिकवणीवरून वाढदिवसाच्या कार्यक्रमाला गोल्डन नेस्ट येथे गेली होती. वाढदिवस आटोपून मित्रासह सायंकाळी साडेसहाच्या सुमारास चालत परत येत होती. मागून एका रिक्षातून आलेल्या लुटारूने स्निग्धा हिच्या हातातील ५२ हजार किमतीचा मोबाइल खेचून पळून गेले. याप्रकरणी १७ एप्रिलला नवघर पोलिसांनी अनोळखी रिक्षाचालक व मागे बसलेला लुटारू अशा दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. सायंकाळी वर्दळीच्या वेळी ही घटना घडल्याने खळबळ उडाली आहे. या घटनेचा पोलिस तपास करत आहेत.

Scanned with CamScanner

दि. 23/04/2023

पुण्यनगरी पान क्र. 3

# पोलिसांना हक्काची वास्तू उभारून सुविधा देऊ !

## उपमुख्यमंत्री फडणवीस यांची ग्वाही



**मीरा रोड :** मीरा-भाईंदर शहरात पोलीस आयुक्तालय सुरू होऊन अडीच वर्षे झाली. परंतु अद्याप पोलीस आयुक्तालयाला स्वतःची इमारत नाही. त्यामुळे मीरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालय इमारतीचे काम यावर्षी सुरू करण्यात येईल. तसेच त्यांना हक्काची वास्तू उभारून सर्व सुविधा उपलब्ध करून देऊ, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. महापालिकेने आयोजित केलेल्या विविध विकासकामांचे लोकार्पण आणि भूमिपूजन सोहळा कार्यक्रम भारतरत्न गानसम्राज्ञी लता मंगेशकर नाट्यगृह येथे पार पडला. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी आ. गीता जैन, माजी खा. डॉ. विनय सहस्त्रबुद्धे, आयुक्त तथा प्रशासक दिलीप ढोले, माजी आ. नरेंद्र मेहता आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.

मीरा-भाईंदर महापालिका मीरा रोड येथील रुग्णालयाचे आरक्षण क्र.२१० व २११ भूखंडावर कर्करोग उपचारासाठी उभारण्यात येणारे रुग्णालय, भाईंदर पश्चिमेला उभारण्यात येणाऱ्या महावीर भवनचे भूमिपूजन व काशिमीरा उड्डाणपुलाखाली बांधलेले उद्यान, मीरागाव येथे बांधलेल्या उर्दू शाळा, भाईंदर पश्चिमेच्या उड्डाणपुलाखाली पशुपक्षी उपचार केंद्राचे लोकार्पण फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. भाईंदर पश्चिमेच्या उड्डाणपुलाखाली अद्ययावत सीसीटीव्ही नियंत्रण कक्ष उभारला आहे. या कक्षाला सर्व सीसीटीव्ही जोडले जाणार आहेत. या अद्ययावत नियंत्रण कक्षाचे लोकार्पण उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी काही कामाचे प्रत्यक्ष जाऊन तर काही कामांचे ऑनलाइन भूमिपूजन व लोकार्पण केले. मीरा-भाईंदर महापालिका शहरात विविध विकासकामे करत आहे. त्या विकासकामांना कितीही निधी लागला तरी कमी पडू दिला जाणार नाही. सूर्या प्रकल्पातून करण्यात येणाऱ्या पाणीपुरवठा योजनेचे काम पूर्ण होत आले असून, एक-दीड वर्षात शहराला पाणीपुरवठा सुरू होईल.

Scanned with CamScanner

दि. 23/04/2023

पुण्यनगरी पू. पान क्र.५

# भाईंदर-वसई जलमार्गाने २० मिनिटांत!

## जूनपासून सुरु होणारी रो रो सेवा वाचवणार ४० किमीचा वळसा

**मीरा रोड :** खा.राजन विचारे यांनी लोकसभा मतदारसंघातील ठाणे, नवी मुंबई व मीरा-भाईंदर या तीन महापालिका क्षेत्रांत जोडणाऱ्या जलमार्गासाठी महाराष्ट्र मेरिटाइम बोर्डामार्फत नव्याने सुरू होणाऱ्या प्रवासी जेट्टीच्या कामांची स्थिती व पर्यटकांसाठी तयार झालेल्या जेट्टी व चौपाटीच्या कामांचा आढावा घेण्यासाठी मुंबई येथे महाराष्ट्र मेरिटाइम बोर्डच्या दालनात बैठक पार पडली. या वेळी भाईंदर ते वसई रो-रो सेवा जूनपर्यंत सुरू होणार आहे, अशी माहिती महाराष्ट्र मेरिटाइम बोर्डाच्या अधिकाऱ्यांनी दिली.

मीरा-भाईंदरवासीयांना वसई येथे जायचे असल्यास छत्रपती शिवाजी मार्गावरून राष्ट्रीय महामार्गावर वर्सोवा पुलामार्गे ४० किमीचा वळसा मारून जावे लागते. रो रो सेवा सुरू झाल्यानंतर तो त्रास कमी होणार आहे. भाईंदर पश्चिमेकडील तयार झालेल्या जेट्टीवरून आपली वाहने बोटीत टाकून ७ किमीच्या पट्ट्यासाठी वसईत जाण्यासाठी २० मिनिटांत सोय उपलब्ध होणार आहे. त्यामुळे इंधन व वेळेची बचत होणार आहे. वसई येथील जेट्टीचे ७० टक्के काम पूर्ण झाले असून, जूनअखेरपर्यंत बोट सेवा सुरू करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.



भाईंदर ते वसई रो रो बोट सेवेचा एक थांबा डोंगरी चौक जेट्टीवर घेण्याचा विचार करण्यात यावा, याची मागणी करण्यात आली. नवी मुंबईतही नेरूळ येथे सिडकोने विकसित केलेल्या नेरूळ ते अलिबाग रो रो सेवा सुरू करण्यासाठी सिडको व महाराष्ट्र मेरिटाइम बोर्ड यांच्यासोबत बैठकीचे आयोजन करण्याचे ठरले आहे. राष्ट्रीय जलमार्ग क्र. ५३ मधील पहिल्या टप्प्यातील कोलशेत, काल्हेर, मीरा भाईंदर-जैसल पार्क तसेच डोंबिवली या जेट्टीची कामे सुरू करण्यास विलंब का होत आहे, असे विचारले असता मुख्य कार्यकारी अधिकारी अमित सैनी यांनी सांगितले की, जेट्टीची कामे सुरू करण्यासाठी निविदा काढण्यात आली होती. परंतु प्रतिसाद न मिळाल्याने पुन्हा निविदा प्रक्रिया सुरू करणार असल्याचे सांगण्यात आले आहे. तसेच राष्ट्रीय जलमार्ग क्र. ५३ अंतर्गत टप्पा २ मधील ऐरोली येथे जैवविविधता केंद्र येथे असणाऱ्या जेट्टी विकसित करावी, अशी मागणीही करण्यात आली होती.

### वरसावे येथेही जेट्टी विकसित

याची विचारणा केली असता, या कामासाठी ३२.८५ कोटींचे अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेसाठी राज्य शासनाकडे पाठवण्यात आल्याचे सांगण्यात आले. तसेच ठाणे व ऐरोली या खाडीदरम्यान जलवाहतुकीला अडथळा ठरणारा रॉक ड्रेजिंग करण्यासाठी नुकतीच ४४० कोटींची प्रशासकीय मान्यता मिळाली. याचे कामही लवकर सुरू होणार असल्याची माहिती देण्यात आली. केंद्रशासन व राज्य शासनाच्या मदतीने वरसावे येथेही पर्यटकांसाठी जेट्टी विकसित करण्यात आली आहे. याचे ९५ टक्के काम पूर्ण झाले असून, या जेट्टीकडे जाणाऱ्या रस्त्याचे काम बाकी आहे. या ठिकाणीही प्रवाशांसाठी कोणकोणत्या सुविधा उपलब्ध करता येतील, जसे की वॉटर स्पोर्ट्स, फेरीबोट, यासाठी इच्छुकांनी मेरिटाइम बोर्डाकडे अर्ज करावेत, असे सांगण्यात आले आहे.

Scanned with CamScanner